सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ५ ऑगस्ट, २००६

**शुध्दीपत्रक**

क्रमांक-डीएलसी-१००६/३३ :- महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण दिनांक ३१ जुलै २००६ मध्ये प्रकाशित करण्यात आलेल्या भारत परिसीमन आयोगाच्या अधिसूचना क्रमांक-२८२/एमटी/२००६, दि.३१ जुलै २००६ मधील मराठी भाषेतील आदेश क्रमांक-२६ मधील तक्ता-अ (विधानसभा मतदारसंघ आणि त्यांची क्षेत्रे) मधील रकाना-२ (व्याप्ती)च्या मजकूरात पुढीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे.

१) २१-ठाणे जिल्हयातील १३७-भिवंडी पूर्व विधानसभा मतदारसंघासमोर दर्शविण्यात आलेल्या व्याप्तीतील भिवंडी एमसीच्या ऐवजी भिवंडी म.न.पा. असे वाचावे.

२) २३-मुंबई शहर जिल्हयातील १८१-माहीम विधानसभा मतदारसंघासमोर दर्शविण्यात आलेल्या व्याप्तीतील वॉर्ड क्रमांक ९३३ (भाग) - दादर मध्ये दर्शविण्यात आलेले ई.बी. नंबर ४०७ ते ४०८ आणि ४५३ ते ४९० वगळण्यात यावेत.

३) ३०-सोलापूर जिल्हयातील२४८-सोलापूर शहर उत्तर विधानसभा मतदारसंघासमोर दर्शविलेल्या व्याप्तीतील सोलापूर म.न.पा. (भाग) मध्ये वॉर्ड क्रमांक ६८ ते ८८ च्या ऐवजी वॉर्ड क्रमांक ८६ ते ८८ असे वाचावे.

४) ३१-सातारा जिल्हयातील २६२-सातारा विधानसभा मतदारसंघासमोर दर्शविण्यात आलेल्या व्याप्तीतील 'अंबर्डे ' च्या ऐवजी 'आंबवडे खुर्द ' असे वाचावे.

५) ३४-कोल्हापूर जिल्हयातील २७८-हातकणगले विधानसभा मतदारसंघासमोर दर्शविण्यात आलेल्या व्याप्तीतील '(वाटार तर्फ वडगांव)' च्या ऐवजी 'वाटार तर्फ वडगांव' असे वाचावे.

-------------------------------------------------------